पुढारी

# तोतया पोलिसाला लोहमार्ग पोलिसांकडून बेड्या

## पोलिस असल्याचे सांगून प्रवासी जाळ्यात; मदतीच्या बहाण्याने अनेकांना गंडा

पुणे : पुढारी वृत्तसेवा

पोलिस असल्याची बतावणी करीत प्रवाशांना लुटणाऱ्या अविनाश भारत भुर्लेकर (वय. २४, रा. सिंदखेरा, ता. हुमनाबाद, जि. बिदर) या तोतयाला लोहमार्ग पोलिसांच्या तपास पथकाने सापळा रचून बेड्या ठोकल्या. या वेळी त्याच्याकडे महाराष्ट्र पोलिसांचा गणवेश व चोरीचा मोबाईल आढळून आला आहे. भुर्लेकर हा पोलिस रेकॉर्डवरील गुन्हेगार असून, त्याने अशाच प्रकारे सिकंदराबाद, हैद्राबाद, दादर, सी.एस.टी. या ठिकाणी पोलिस असल्याची बतावणी करीत गुन्हे केल्याचे कबूल केले.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संतोष पासवान (वय. १८, रा. बिहार) हे ६ डिसेंबर रोजी सव्वादोनच्या सुमारास त्यांच्या गावी जाण्यासाठी रेल्वे तिकाटाची चौकशी करीत होते. दरम्यान, एका अनोळखी व्यक्तीने तो पोलिस असल्याची बतावणी करीत त्यांच्याकडे पैशांची विचारणा केली. त्यानंतर ही रक्कम तिकीट बुक करण्याच्या फॉर्मवर नोंदणी करावी लागेल, असे सांगत पासवान यांच्याकडील ११ हजारांची रोकड घेतली. पुढे पासवान यांना आधार कार्डची झेरॉक्स घेऊन येण्याच्या बहाण्याने बाजूला लावत आरोपीने पळ काढला होता. याबाबत लोहमार्ग पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

दाखल गुन्ह्यांच्या अनुषंगाने तपास करीत असताना पोलिसांना माहिती मिळाली होती की, हा तोतया पोलिस स्टेशन परिसरात येणार आहे. त्यानुसार पोलिस अधीक्षक सदानंद वायसे -पाटील, अपर अधीक्षक कविता नेरकर-पवार यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलिस निरीक्षक मौला सय्यद , सुरेशसिंग गौड यांनी बुकिंग ऑफिस व प्लॅटफार्म येथे सापळा लावून संशयित तरुणाला ताब्यात घेतले. त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता, त्याने गुन्हा केल्याची कबुली दिली. ही कामगिरी सहायक पोलिस निरीक्षक बाळासाहेब अंतरकर, हवालदार सुनील कदम, अनिल टेके, अनिल दांगड, स्वप्निल कुंजीर, बेबी थोरात, केंद्रे, आळंदे, कुंजीर यांच्या पथकाने केली.

My Pune Edition
Dec 17, 2020 Page No. 3
newspaper.pudhari.co.in